# सापळा केस

दिनांक १५/०६/२०२०

**आलोसे सुरेश बाजीराव पाटील, पोलीस हवालदार /९१५ ने पोस्टे गंगाखेड रा.पोलीस वसाहत गंगाखेड यांनी १०००/– रू लाच स्विकारले बाबत यशस्वी सापळा कारवाई**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.परभणी येथे दि. १४.०६.२०२० रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, दि. १०.०६.२०२० रोजी तक्रारदार यांचे भाऊ अमिन खान याने त्यांचेशी शेताचे वादावरून भांडण केल्याने पोलीस स्टेशन गंगाखेड येथे त्यांचे विरूध्द तक्रार देवुन त्यांचेवर, त्यांचें दोन मुलावर व सुनेवर केस दाखल केली होती. सदर केसचा तपास पोलीस स्टेशन गंगाखेडचे जमादार पाटील यांचे कडे असुन त्यांनी दिनांक १३.०६.२०२० रोजी तक्रारदार यांना पोोलीस स्टेशन गंगाखेड येथे बोलावून सदरची केस जर पोलीस स्टेशनला मिटवायचे असेल तर पैसे द्यावे लागेल असे म्हणुन त्यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केली आहे त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.

त्यानुसार दि १५.६.२०२० रोजी लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत तक्रारदार यांचे विरूध्द दाखल असलेल्या केसमध्ये (एन.सी.) मदत करून पो.स्टे.ला मिटवून घेण्यासाठी १०००/– रूपये लाचेची मागणी करून दि. १५.०६.२०२० रोजी आलोसे सुरेश बाजीराव पाटील, पोलीस हवालदार /९१५ ने पोस्टे गंगाखेड रा.पोलीस वसाहत गंगाखेड यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम १,०००/– रूपये स्विकारली आहे. व नमुद आरोपीस स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले आहे. वर नमुद आलोसे यांचे विरूध्द पो.स्टे.गंगाखेड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, पोना/अनिल कटारे, पोना/अनिरूध्द कुलकर्णी, पोह/हनुमंते, पोह/शकील, पोना/शेख मुखीद, पोशि/चट्टे, मपोशि/सारीका टेहरे, चापोना/कदम, ॲ.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारी विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती कल्पना बारवकर,पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि.नांदेड,परिक्षेत्र नांदेड – ८८८८८४१९६५
श्री. भरत के. हुंबे, पोलीस उप अधिक्षक – ७०२१००२११०
श्री. अमोल कडु, पोलीस निरीक्षक – ८०८७०७२९१९

Scanned with CamScanner